महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने
अंतर्गत राज्यात तक्रार निवारण प्राधिकारी
("Ombudsman ") नियुक्त करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग(रोहयो)
शासन निर्णय क्रमांक : मग्रारोहयो-२०१०/प्रक्र१३३/रोहयो-६
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
दिनांक :१० जानेवारी,२०११

**वाचावे:-** भारत सरकार, ग्रामीण विकास विभाग, ग्रामविकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे
आदेश क्र - जे-११०११/२१/२००८- एमजीएनआरईजीए, दिनांक-७ सप्टेबर, २००९.

**प्रस्तावना :-** केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा-२००५ अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र राज्यात लागू केली आहे. ग्रामीण भागातील कुटुंबातील प्रौढ व्यक्ती स्वेच्छेने अंग मेहनतीचे काम करण्यास तयार आहे, अशा कुटुंबास एका आर्थिक वर्षात किमान १०० दिवस कामाची हमी केंद्र शासनाने या कायद्यान्वये दिली आहे.

केंद्र शासनाच्या या योजनेसंदर्भातील सर्व आवश्यक लाभ सदर योजनेच्या कामावरील मजुरांना मिळावा, या योजनेमध्ये पूर्णपणे पारदर्शकता असावी, मजुरांच्या तक्रारींचे निराकरण जलद गतीने व्हावे, त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ नये, यासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायद्याच्या कलम २७ (१) अंतर्गत राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी "Ombudsman " (लोकप्राधिकरणा विरुध्दच्या तक्रारींची तपासणी करण्यासाठी नियुक्त केलेला अधिकारी) नियुक्त करण्याचे निर्देश केंद्र शासनाच्या क्र.जे-११०११/२१२००८-नरेगा,दि.७ सप्टेंबर,२००९ च्या आदेशान्वये दिले आहेत. त्या अनुषंगाने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत तक्रार निवारण प्राधिकारी "Ombudsman " नियुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सदर आदेशाच्या अनुषंगाने प्रथमतः राज्यातील १८ जिल्हयांसाठी तक्रार निवारण प्राधिकारी नियुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे

**शासन निर्णय :-** केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम - २००५ या कायद्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अत्यंत यशस्वी व प्रभावीपणे राज्यात राबविण्यात येत आहे. सदर योजनेमध्ये काम करणा-या कुटुंबावर किंवा मजूरावर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ नये व त्यांनी केलेल्या कामाचा मोबदला त्यांना व्यवस्थित मिळावा आणि त्यामध्ये कोणत्याही परिस्थितीत गैरप्रकार होता कामा नये, याची दखल शासनाने घेतली आहे. त्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना व

संदर्भाधीन दिनांक- ७/९/२००९ च्या आदेशान्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत राज्यातील १८ जिल्हयांमध्ये सोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मधील प्राधिका-यांची त्यांच्या नावा समोर दर्शविलेल्या पदनामानुसार Ombudsman / Dy. Ombudsman म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. नियुक्त करण्यात आले-या Ombudsman / Dy. Ombudsman यांना रूजू करून घेण्याची कार्यवाही संबधित जिल्हाधिकारी यांनी करावी.

२ राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियमाच्या आणि राज्यांनी त्या अधिनियमांसाठी तयार केलेल्या योजनांच्या अंमलबजावणी संदर्भातील गा-हाणे दूर करुन तक्रारी निकालात काढण्यासाठी तक्रार निवारण यंत्रणा स्थापन करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियमातील कलम २७ अन्वये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वरील तक्रार निवारण प्राधिका-यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर नियुक्त करण्यात आलेल्या तक्रार निवारण प्राधिका-यांचे अधिकार, कर्तव्ये व जबाबदा-या संदर्भाधीन दिनांक- ७ सप्टेंबर, २००९ च्या आदेशातील तरतुदींनुसार असतील. केंद्र शासनाच्या आदेशानुसार तक्रार निवारण प्राधिकारी यांना प्रत्येक सुनावणीसाठी / बैठकीसाठी रु. ५००/- ( रुपये पाचशे फक्त ) एवढे परिश्रमिक देण्यात येईल. हे परिश्रमिक पूर्णतः मानधन स्वरूपात असेल. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत नियुक्त केलेल्या तक्रार निवारण प्राधिकारी यांचे कार्यालय जिल्हयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी असेल.

३. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नियुक्त करण्यात आलेल्या तक्रार निवारण प्राधिकारी यांची नियुक्ती ते ज्या दिनांकापासून रूजू होतील त्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीसाठी किंवा त्यांच्या वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत किंवा यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या कालावधीसाठी करण्यात येत आहे. त्यांचे काम समाधानकारक असल्यास त्याचा कालावधी कामाच्या मूल्यमापनावर आधारित एक वर्षापर्यंत वाढविता येईल. सदर पदावर नियुक्त करण्यात आलेली व्यक्ति पुनर्नियुक्तिस पात्र असणार नाही. तक्रार निवारण प्राधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या प्राधिका-यांची राज्यशासनाच्या निवड समितीमार्फत त्यांच्या कामाचे मुल्यमापन करण्यात येईल. त्यांनी केलेल्या कामाच्या मुल्यमापनाच्या अहवालाची प्रत रोजगार हमी योजना परिषदेकडे सादर करण्यात येईल. तक्रार निवारण प्राधिकारी यांची कामगिरी असमाधानकारक असल्यास राज्य शासनाच्या निवड समितीच्या शिफारशीनुसार त्यांना पदावरुन दूर करण्यात येईल. तक्रार निवारण प्रधिकारी यांची नियुक्ती राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम -२००५ मधील कलम २७ (१) अन्वये आणि केंद्र शासनाच्या संदर्भीय दिनांक ७ सप्टेंबर, २००९ च्या आदेशातील तरतुदीनुसार व त्यामधील अटी व शर्तींच्या तसेच त्यामध्ये वेळोवेळी होणा-या सुधारणांच्या अधीन राहून करण्यात येत आहे. संदर्भाधीन आदेशाची प्रत केंद्र शासनाच्या www.nrega.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

४ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अधिनियमांतर्गत नियुक्त केलेल्या तक्रार निवारण प्राधिकारा यांच्या कार्यालयाची व त्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींची व्यवस्था संबंधित जिल्हाधिकारी यांनी तात्काळ करुन द्यावी. त्यांच्या कार्यालयासाठी एक लिपिक व एक शिपाई असे दोन पूर्ण वेळ किंवा अर्धवेळ कर्मचारी सेतू मार्फत उपलब्ध करुन देण्यात यावेत किंवा करार पध्दतीवर सेवा पुरविणा-या संस्थेमार्फत हे दोन कर्मचारी उपलब्ध करुन दयावेत.

५. तक्रार निवारण प्रधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने स्थळ तपासणीसाठी (Spot Inspection ) वाहन व्यवस्था, त्यांचे परिश्रमिक, कार्यालयीन खर्च, करार पध्दतीवर नियुक्ती केलेल्या कर्मचा-यांचे परिश्रमिक इत्यादी बाबत होणारा खर्च केंद्र शासनातर्फे प्रत्येक जिलहाधिकारी कार्यालयास महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत प्राप्त होणा-या ६ % निधीतून करण्यात यावा. प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने स्थळ तपासणीसाठी आठवडयातून एकदाच वाहन व्यवस्था उपलब्ध करुन दिली जावी सदर वाहन भाडे तत्वावरचे असावे. तक्रार निवारण प्रधिकारी यांचेकडे प्राप्त झालेल्या तक्रारींवरील सुनावणी जिल्हा मुख्यालयाच्या किंवा तालुका स्तरावर आठवडयातून एक किंवा दोन वेळा आयोजित करावी. त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने त्यांना सहकार्य करावे.

६. सदर शासन निर्णय केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार व त्यांचे सदर्भीय आदेश क्रमांक जे -११०११/२१/२००८-एनआरइजीए, दिनांक ७ सप्टेंबर, २००९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

७. सदर शासन निर्णय हा राज्य शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र 201101101552410001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

वि.गिरीराज

(व्ही.गिरीराज)

प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो)

प्रति,

मा.मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव

मा.राज्यमंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव

मा.मुख्यसचिव यांचे स्वीय सहायक

सर्व विभागीय आयुक्त

सर्व जिल्हाधिकारी तथा कार्यक्रम समन्वयक

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सर्व जिल्हा कार्यक्रम समन्वयक, जिल्हा परिषद,

सर्व उपायुक्त ( रोहयो ), विभागीय आयुक्त कार्यालय,

सर्व विशेष कार्य अधिकारी तथा उप विकास आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय,

सर्व तहसिलदार तथा कार्यक्रम अधिकारी ( मग्रारोहयो ),

सर्व गट विकास अधिकारी तथा उप कार्यक्रम अधिकारी ( मग्रारोहयो )

सर्व कार्यासन अधिकारी, नियोजन विभाग ( रोहयो ), मंत्रालय, मुंबई,

निवडनस्ती, रोहयो -६.

## प्रपत्र - अ

### महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत नियुक्त करण्यात आलेल्या तक्रार निवारण व उप तक्रार निवारण प्राधिकारी (Ombudsman / Dy. Ombudsman) यांची यादी

| अ.क्र. | जिल्हा | उमेदवाराचे नाव | जन्म दिनांक | वय | पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | कोकण विभाग | | | |
| १ | ठाणे | श्री.व्ही.बी.सात्वी | १/४/१९४८ | ६२ वर्ष | Ombudsman |
| २ | रायगड | श्रीमती.वैशाली राज पाटील | १४/७/१९७० | ४० वर्ष | Ombudsman |
| ३ | रत्नागिरी | श्री. प्रशांत डी. पटवर्धन | १५/१/१९७० | ४१ वर्ष | Ombudsman |
| ४ | सिंधुदुर्ग | श्री.अल्ताफ हुसेन अब्दुल रहेमान खान | ८/१२/१९५१ | ५९ वर्ष | Ombudsman |
| | | पुणे विभाग | | | |
| ५ | कोल्हापूर | श्री.अप्पासाहेब शिवाप्पा माळी | ५/२/१९४७ | ६२ वर्ष | Ombudsman |
| ६ | सोलापूर | श्री.बसवराज जी. नवले, | १६/३/१९६४ | ४६ वर्ष | Ombudsman |
| | | नाशिक विभाग | | | |
| ७ | नाशिक | श्रीमती.मेघा आर.बोरसे | १७/९/१९६२ | ४८ वर्ष | Ombudsman |
| ८ | नंदूरबार | श्री.सुदाम के.चौधरी | १/११/१९५१ | ५९ वर्ष | Ombudsman |
| ९ | धुळे | डॉ.धनंजय व्ही.नेवाडकर | १/६/१९६५ | ४५ वर्ष | Ombudsman |
| | | औरंगाबाद विभाग | | | |
| १० | औरंगाबाद | श्री.फईम महमूद | २५/१२/१९५० | ५९ वर्ष | Ombudsman |
| ११ | बीड | श्री.एस.जे.पानोटे | १५/२/१९४९ | ६१ वर्ष | Deputy Ombudsman |
| १२ | लातूर | श्री.एस.बी.राजूरकर | ३/४/१९५१ | ५९ वर्ष | Deputy Ombud man |
| | | अमरावती विभाग | | | |
| १३ | अमरावती | ॲड.श्री.सुरेश धनंजय भेंडे | १३/१०/१९५८ | ५१ वर्ष | Ombudsman |
| १४ | वाशिम | श्री.निर्मलसिंग डी.खालसा | ८/५/१९५० | ६० वर्ष | Ombudsman |
| १५ | बुलढाणा | प्रा.निवृत्ती एन.इंगळे | १/७/१९५१ | ५९ वर्ष | Ombudsman |

| नागपूर विभाग | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६ | नागपूर | श्री.एन.एम.लोखंडे | ३/७/१९४९ | ६१ वर्ष | Ombudsman |
| १७ | गोंदिया | श्री.रामदास विस्तारी सलांजे | ६/२/१९५१ | ५९ वर्ष | Deputy Ombudsman |
| १८ | भंडारा | श्री.वसंत बी.नेमा | १२/८/१९५१ | ५९ वर्ष | Ombudsman |
| १९ | भंडारा | श्री.एम.जी.वाघाये | २/३/१९५१ | ५९ वर्ष | Obmudsman |

(व्ही.गिरीराज)

प्रधान सचिव,नियोजन विभाग (रोहयो)

**********************